HISTORICITY RESEARCH JOURNAL

# ताराबाई शिंदे यांचे आधुनिक क्रांतीदर्शी विचार



**डॉ. वंदना रामचंद्र लोंढे**
**क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल .**
**ता.पलूस जि. सांगली.**

१९ वे शतक उजाडले ते म्हणजे प्रबोधनाची पहाट घेऊन. या प्रबोधन युगाने माणूस माणसासाठी जागृत होऊ लागला. उपेक्षित स्त्रियांच्या व्यथा, वेदना समाजासमोर येऊ लागल्या. राजा राममोहन राय, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या दूरदृष्टीचा समाजात काही लोक विचार करून त्यांच्या अन्वेशन दृष्टीचा स्वीकार करू लागले. त्यातलीच एक होत्या ताराबाई शिंदे.

चार भिंतीच्या आत राहून घर सांभाळणारी स्त्रीचआदर्श समजण्यात येऊ लागली. मनस्मृतीने तिच्यावर कठोर बंधने लादली 'न स्त्री स्वातंत्र्य अर्हती' असेच चित्र त्याकाळी दिसू लागले होते आजही फारसे चित्र बदललेले आहे असे मला वाटत नाही.

ताराबाई शिंदे यांनी'स्त्री -पुरुष तुलना'या ग्रंथात किती क्रांतिकारी, धाडसी विचार आधुनिक दृष्टिकोन ठेवून मांडले आहेत याची प्रचिती येते. प्रत्येक स्त्रीला माणसाच्या पातळीवर आणण्याचे ध्येय कार्य ताराबाई शिंदेने केले असे मला वाटते म्हणून मी हा शोधनिबंध लिहिला आहे.

## उद्देश –

१) ताराबाई शिंदेचे स्त्री -पुरुष समानतेवरील परखड मत समजते.
२) स्त्रियांविषयीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन समजते
३) स्त्री-पुरुषांच्या कल्याणाची भूमिका समजते
४) स्त्रियांविषयीचा दृष्टिकोन समजतो.

## आधुनिक क्रांतीदर्शी विचार:-

ताराबाई शिंदे यांची दृष्टी अतिशय सूक्ष्म आहे भोवतीच्या जीवनाकडे त्या उघड्या डोळ्यांनी पाहतात. बुलढाण्यातील सत्यशोधक कार्यकर्ते बापूजी हरी शिंदे यांच्या त्या मुलगी होतइ.स. १८८१ मध्ये विजयालक्ष्मी नामक विधेवेवर चाललेला खटला व तिचा न्यायनिवाडा या घटनांनी प प्रसारित झालेली वृत्ते ताराबाईच्या मनाला स्पर्शून गेली या घटनेचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला. विधवेने भ्रूणहत्या करणे, तिच्यावर समाजाकडून खटला चालवला जाणे, तिला फाशीची शिक्षा ठोठावणे ह्या बाबींमुळे ताराबाई संत झाल्या. कडक शब्दात पितृ सत्ताक मानसिकता असणाऱ्या समाजाकडून स्त्रियांवर कसे अन्याय अत्याचार होतात. कौटुंबिक पातळीवरील विविध घटनांचे दाखले देत त्याअनुषंगाने लादली गेलेली धार्मिक अनुष्ठाने, प्रथा, परंपरा लिंग भावाधारित भेदनीतीच्या आधारे स्त्रियांचे शोषण कसे होते हे त्यांनी इ.स. १८८२ मध्ये 'स्त्री- पुरुष तुलना'नावाच्या पुस्तिकेत सविस्तरपणे लिहिले.[१]

वेदोत्तर काळात वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीसंस्थेमध्ये झाले होते एका जातीतून दुसऱ्या जातीत जाणे ही गोष्ट कठीण होऊन बसली होती. कनिष्ठ जातीतील स्त्रियांची अवस्था अत्यंत वाईट होती. जातीव्यवस्था स्त्रियांचे शोषण करते याची स्पष्ट जाणीव ताराबाईंना होती .[२]

मध्ययुगीन महाराष्ट्रातील पूर्वापार पासून चालत आलेल्या प्रथा, परंपरा वसाहत काळातही कशा चालू आहेत व त्याचे जात, पितृसत्ताक व लिंग भावाधारित विषम व्यवस्थेविषयी टीकात्मक विश्लेषण परखडपणे मांडतात[३] स्त्रीभ्रूणहत्या, जरठ- कुमारी विवाह, बहुपत्नीत्व, स्त्रियांवरील कोठुंबिक अत्याचार, गृहिणींना दिली जाणारी अपमानास्पद वागणूक इचे मिथकांच्या माध्यमातून विचार मांडले आहेत. मराठी साहित्यातील त्या पहिल्या स्त्रीवादी समीक्षक होत. मंजूघोष मुक्तामिला, मनोरमा नाटक इ.साहित्याची त्यांनी समीक्षा केली. नातेसंबंधातून पितृसत्ता व स्त्रियांवरील अत्याचार याची त्यांनी चिकित्सा केली होती.ताराबाई शिंदे यांच्या विचारांवर महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीचा व अस्तित्ववादी स्त्री विचारांचा प्रभाव दिसून येतो [४] ताराबाई शिंदे अस्तित्ववादी, स्त्रीवादाच्या चौकटीत समकालीन वासाहतीक अज्ञानी, अबला स्त्रियांमध्ये आत्मभान निर्माण करतात.

## शोषितांच्या शोषणाची मीमांसा:-

भाकडकथां मागे दडलेली सर्वसामान्य माणसाची मूळ प्रतिमा शोधून काढणे आणिशोषणासाठी घुसडलेला चमत्काराचा भाग दूर करणे ही महात्मा फुले परंपरेतील इतिहास-मीमांसेची लक्षणे होत[५] या पद्धतीने सामान्य माणसाची अस्मिता जागी करण्याचा प्रयत्न या थोर धुरीनणांनी आपल्या लेखणीने आणि कर्तुत्वाने केला आहे.ताराबाई शिंदेही याच परंपरेत मोडतात महात्मा फुले यांच्या विचारांचा आणि अन्वेषण पद्धतीचा ताराबाई शिंदे यांच्यावर सर्वाधिक परिणाम झाला यांनी शोषितांच्या शोषणाची मीमांसा केली.ताराबाईनी आपले सगळे लेखन स्त्रीशोषणावर केंद्रित केले. त्यांच्या मते खऱ्या धर्माप्रमाणे आज कोणी वागत नाही. शास्त्र पुराणाप्रमाणे वागत नाही, परंतु पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी मात्र धर्म कायम पुढे येतो. किंबहुना सामान्यांच्या दिन दुबळयांच्या शोषणासाठी धर्म पुढे येतो.त्याप्रमाणे स्त्रियांच्या शोषणासाठी पुरुषधर्म राबवून घेतात.पुरुषी समाजरचनेचा प्रभाव जीवनाच्या सर्व अंगावर पडतो.[६]

## स्त्री प्रश्नांची मांडणी:-

पौराणिक मिथकांच्या आधारे ताराबाईनीं जात, पित्तसत्ताक लिंगभाव हे घटक स्त्रीशोषणास कसे कारणीभूत आहेत, याचा ऊहापौह केला आहे.

समाज हा लिंगभेदावर आधारित विषमतेचा समाज होता. गण समाजातून स्त्री-दास्याला प्रारंभ झाला व जाती -व्यवस्थेत स्त्रीला बंदिस्त केले.[७] पितृसत्ताक म्हणजे पित्याची सत्ता, ही केवळ सत्ता नाही तर ती व्यवस्थात्मक बाब आहे .या व्यवस्थेबरोबरच पितृसत्तेचा संस्था म्हणून ऐतिहासिक विकास झाला आहे.[८]

थोडक्यात, गृहिणी स्त्री ही रात्रंदिवस नवऱ्याच्या सेवत असणारी विनावेतन काम करणारी कामगार असते. स्त्री कोणत्याही जातीची किंवा वर्गाची असो ती संबंधित समाजात शूद्र मानल्या गेलेल्या शारीरिक कष्टाची जी कामे असतात ती विशेष महत्त्वाची समजली जात नाहीत . जेव्हा स्त्री घरात काम करते तेंव्हा त्या कामाला काहीच मूल्य नसते. त्यांच्या श्रमाला काम म्हणून उल्लेख केला जात नाही घराबाहेर एखादी स्त्री तेच काम करीत आहे असेल तर त्याला मोबदला दिला जातो. कौटुंबिक श्रमविभागणी व पितृसत्ताकता संस्काराचा मुद्दा मानून पुरुषांनी सहजपणे गृहिणीच्या श्रमाला कामाचा दर्जा न देता संस्कार लादले जाऊन स्वाभाविकपणे पुरुषीसत्ता कौटुंबिक पातळीवर निर्माण केली .एवढेच नाही तर दैनंदिन जीवनात स्त्रियांच्या वर्तनावर कौटुंबिक, धार्मिक अनुष्ठाने व सांस्कृतिक नियमांच्या आधारे कडक नियंत्रण ठेवले जाते.

## संदर्भ:-

१) गेल ऑम्लेट ,ज्योतिबा फुले आणि स्त्री मुक्तीचा विचार, म. फुले स्मृती शताब्दी, लोकवाड:मयगृह सहावी आवृत्ती, २००९ पृष्ठ -२२

२) समाज प्रबोधन पत्रिका -वर्ण जातीव्यवस्था म्हणजे काय ? पुणे जानेवारी ,फेब्रुवारी १९९५ पृष्ठ -33

३) भागवत वंदना सपकाळ –स्त्रीवाद, स्त्री-वादाचे समकालीन चर्चा विश्व (संपा) शब्द पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती २०१४, पृष्ठ,४१५

४) बोव्हुआर द सिनोम ; द सेकंड सेक्स(अनु. करुणा गोखले ) पद्मगंधा प्रकाशन, पुणे , प्रथम आवृत्ती- २०१२, पृष्ठ - २४५

५) कोत्तापल्ले नागनाथ (संपा) ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री -पुरुष तुलना'सायन पब्लिकेशन , पुणे प्रथम आवृत्ती १९९० पृष्ठ-१७
६) कित्ता
७) चव्हाण प्रवीण, पितृसत्ता समजून घेताना, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, स्त्री अभ्यास केंद्र पुणे, प्रथम आवृत्ती -२०१० पृष्ठ -१
८) पाटील शरद , अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र, सुगावा प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती-१९८८ पृष्ठ -९१